(दूरध्वनी क्र.) ०२४०-२३३३५३६-४० (पी.बी.एक्स.)
२३३१२८१, २३३१२८३
फॅक्स नं.०२४०-२३३१२१३

जा.क्र./मनपा/निवडणूक/५६९/२०१५ दिनांक :- १०-७-२०१५

**प्रति**
मा.सचिव
राज्य निवडणूक आयोग,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**विषय** :- औरंगाबाद महानगरपालिकेच्या सातारा-देवळाई हद्दवाढ क्षेत्राची निवडणूक-२०१५ प्रारूप प्रभाग रचनेच्या हरकती बाबत.

**संदर्भ** :- आपले पत्र क्र.रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.१४/का-५, दि.२५-०६-२०१५

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून सविनय कळविण्यात येते की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या सातारा-देवळाई हद्दवाढ क्षेत्राची निवडणूक-२०१५ करीता दिनांक ०१-०७-२०१५ रोजी प्रारूप प्रभाग रचना प्रसिध्दी केली असून दिनांक ०१-०७-२०१५ ते ०७-०७-२०१५ या कालावधीत हरकती व सूचना स्विकारण्यात आली आहे. या कालावधीत एकूण ०५ हरकती दाखल झालेल्या असून हरकतीचे स्वरूप व कथन आणि महानगरपालिकेचे अभिप्राय हे विवरणपत्र-१ मध्ये पाठविण्यात येत आहे.

करिता, माहितीस्तव सविनय सादर.

निवडणूक विभाग प्रमुख
महानगरपालिका, औरंगाबाद

**प्रत** :-
मा.आयुक्त महोदय, महानगरपालिका, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

औरंगाबाद महानगरपालिका
निवडणूक विभाग
औरंगाबाद

औरंगाबाद महानगरपालिका सातारा-देवळाई हद्दवाढ क्षेत्राची निवडणूक-२०१५

विवरणपत्र-१

**प्रारूप प्रभाग रचना बाबत दि.०१-०७-२०१५ ते ०७-०७-२०१५ या कालावधीत प्राप्त आक्षेप व हरकतींची वॉर्ड निहाय यादी व तपशिल**

| अ. क्र. | हरकत क्रमांक | दिनांक | हरकतदाराचे नाव व पत्ता (सर्वश्री व श्रीमती) | संबंधीत प्रभाग क्रमांक | हरकतीचे स्वरुप व कथन | महानगरपालिकेचे अभिप्राय | सुनावणीनंतर प्राधिकृत अधिकाऱ्यांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | ४/७/२०१५ | राजेंद्र लक्ष्मणराव नरवडे (भ्र.क्र.९४२२४५५०१०) | ११४, ११५ | दि.१८-१-२०१५ ते २१-१-२०१५ दरम्यान घेतलेल्या सर्वेक्षणानुसार देवळाई व सातारा तांडा येथील लोकसंख्या १२९० इतकी झालेली आहे. तथापि, सदर लोकसंख्या जनगणना कार्यालयाच्या आकडेवारीशी जुळत नाही. वॉर्ड तयार करतांना संबंधित अधिकाऱ्यानी प्रत्यक्ष लोकसंख्येनुसार वॉर्ड तयार केले नाहीत. दोन्ही वॉर्डचे आरक्षण करताना प्रत्यक्षात जाती निहाय लोकसंख्येचा विचार न करताच नियमबाहयपणे या दोन्ही वॉर्डाचे आरक्षण करण्यात आले आहे. वॉर्ड तयार करतांना प्रत्यक्ष भौगोलिक परिस्थतीचा विचार करण्यात आलेला आहे. | औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये नव्याने समावेश झालेल्या भागामध्ये सातारा (शहर), सातारा तांडा व देवळाई (ग्रामीण यांचा समावेश आहे.) सातारा हा भाग शहर म्हणून गणना होत असलेने सातारा या क्षेत्राची अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रगणक गट निहाय लोकसंख्या उपलब्ध झाली आहे. तथापि, सातारा तांडा व देवळाई हे ग्रामीण क्षेत्र असल्याने या क्षेत्राकरीता प्रगणक गट निहाय लोकसंख्या उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे दि.१८-१-२०१५ ते २१-१-२०१५ या कालावधीत सातारा तांडा व देवळाई परिसरातील जनगणनेच्या प्रगणक गटामध्ये सन २०११ च्या जनगणनेच्या वेळेस त्याठिकाणी राहत असलेल्या नागरीकांची माहिती घेण्यात आली त्याआधारे प्रगणक गट निहाय लोकसंख्येपैकी अनुसूचित जातीची लोकसंख्या-१२७२ व अनुसूचित जमाती लोकसंख्या-१०९ आढळुन आलेली आहे. तथापि, सन २०११ चे जनगणना नुसार या भागातील अनुसूचित जमातीची लोकसंख्या १०८० एवढी आहे व त्याचा विचार करून नैसर्गिक हद्दी विचारात घेवुन लोकसंख्या निकषा आधारे वॉर्ड रचना केली आहे. यामधील दोन्ही वॉर्ड आरक्षित करण्यात आले नसून यापैकी एक वॉर्ड अनुसूचित जमाती (महिला) करीता आरक्षित आहे. तर दुसरा वॉर्ड सर्वसाधारण / खुला आहे. ही सर्व कार्यवाही नियमानुसार झाली आहे. सबब हरकत फेटाळणे योग्य. | |

| अ. क. | हरकत क्रमांक | दिनांक | हरकतदाराचे नाव व पत्ता (सर्वश्री व श्रीमती) | संबंधीत प्रभाग क्रमांक | हरकतीचे स्वरुप व कथन | महानगरपालिकेचे अभिप्राय | सुनावणीनंतर प्राधिकृत अधिकाऱ्यांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | २ | ७/७/२०१५ | शेख जियाऊल्ला शेख अकबर पटेल (भ्र.क्र.९७६७८९३५७७) | ११४, ११५ | सातारा देवळाई नगर पालिका प्रभाग रचना अधिसूचना व एस.टी. व सर्व साधारण वॉर्ड रद्द करणे बाबत. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणूकीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीनुसार औरंगाबाद महानगरपालिका करीता सन २०११ च्या जनगणना आधारे असलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणात मा.राज्य निवडणूक आयोगाने ११३ एवढी सदस्य संख्या निश्चित केली आहे. औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये नंतरच्या काळात सातारा देवळाई नगर परिषदेचा समावेश झाल्याने उक्त अधिनियमच्या तरतुदीनुसार एकत्रित लोकसंख्येकरीता महानगरपालिकेची सदस्य संख्या ११५ निश्चित करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणूकीमध्ये ११३ प्रभागांमधुन ११३ सदस्य यापूर्वीच निवडून आले असल्याने उर्वरीत दोन सदस्य आता सातारा देवळाई या नव्याने समावेश झालेल्या भागातुन निवडावे लागणार आहेत. त्यामुळे सातारा देवळाई भागाची दोन प्रभागात विभागणी करण्यात आली आहे व ते महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-१९४९ चे कलम-५ प्रमाणे तसेच मा.राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र दि.१९-०५-२०१५ नुसार योग्य आहे. सातारा-देवळाई नगर पालिका बरखास्त करून ते क्षेत्र औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. याबाबत अधिसूचना व त्याअनुषंगाने कार्यवाही शासन स्तरावर पूर्ण झाली आहे व सातारा देवळाई क्षेत्रकरीता वर नमूद केले प्रमाणे दोन वॉर्ड होतात व त्यापैकी एक वॉर्ड खुला असून दुसरा वॉर्ड आरक्षित आहे. तरी हरकत फेटाळणे योग्य. | |

निवडणूक विभाग
औरंगाबाद महानगरपालिका

| अ. क्र. | हरकत क्रमांक | दिनांक | हरकतदाराचे नाव व पत्ता (सर्वश्री व श्रीमती) | संबंधीत प्रभाग क्रमांक | हरकतीचे स्वरुप व कथन | महानगरपालिकेचे अभिप्राय | सुनावणीनंतर प्राधिकृत अधिकाऱ्यांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ३ | ७/७/२०१५ | अनिता कुमावत (भ्र.क्र.९६३७३०१५१५) | ११४, ११५ | औरंगाबाद महानगरपालिका नुकत्याच झालेल्या निवडणूकीत एक वॉर्डाची मतदार संख्या ६००० ते ८००० होती. मग सातारा देवळाई पोट निवडणूकी वॉर्ड क्र.११४ ला २७००० व ११५ ला २५००० कशी अशी तफावत का. | औरंगाबाद महानगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणूकीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीनुसार औरंगाबाद महानगरपालिका करीता सन २०११ च्या जनगणना आधारे असलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणात मा.राज्य निवडणूक आयोगाने ११३ एवढी सदस्य संख्या निश्चित केली आहे. तथापि, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये नंतरच्या काळात सातारा देवळाई नगर परिषदेचा समावेश झाल्याने उक्त अधिनियमच्या तरतुदीनुसार एकत्रित लोकसंख्येकरीता महानगरपालिकेची सदस्य संख्या ११५ निश्चित करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणूकीमध्ये ११३ प्रभागांमधुन ११३ सदस्य यापूर्वीच निवडून आले असल्याने उर्वरीत दोन सदस्य आता सातारा देवळाई या नव्याने समावेश झालेल्या भागातुन निवडावे लागणार आहेत. त्यामुळे सातारा देवळाई भागाची दोन प्रभागात विभागणी करण्यात आली आहे व ते महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-१९४९ चे कलम-५ प्रमाणे तसेच मा.राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र दि.१९-०५-२०१५ नुसार योग्य आहे. लोकसंख्या निकषानुसार महानगरपालिका निवडणूकीसाठी व आताचा वाढीव क्षेत्रासाठी वॉर्ड रचना करण्यात आली आहे व त्याप्रमाणे वॉर्डची लोकसंख्या आहे. वॉर्ड रचनाचे लोकसंख्या निकषात त्यामुळे फरक आहे. त्यामुळे वॉर्ड लोकसंख्या मध्ये तफावत आहे. करिता हरकत फेटाळणे योग्य. | |

औरंगाबाद महानगरपालिका निवडणूक विभाग औरंगाबाद

| अ. क्र. | हरकत क्रमांक | दिनांक | हरकतदाराचे नाव व पत्ता (सर्वश्री व श्रीमती) | संबंधीत प्रभाग क्रमांक | हरकतीचे स्वरुप व कथन | महानगरपालिकेचे अभिप्राय | सुनावणीनंतर प्राधिकृत अधिकाऱ्यांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ४ | ७/७/२०१५ | प्रदीप वसंतराव जाधव, सातारा परिसर | ११४, ११५ | दि.१८-१-२०१५ ते २१-१-२०१५ दरम्यान घेतलेल्या सर्वेक्षणानुसार देवळाई व सातारा तांडा येथील लोकसंख्या १०८० इतकी वाढवुन दाखविण्यात आलेली आहे. सदर लोकसंख्या जनगणना कार्यालयाच्या आकडेवारीशी जुळत नाही. तसेच वरील आरक्षण जे टाकण्यात आले ते पूर्णत: चुकीची आहे. | औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये नव्याने समावेश झालेल्या भागामध्ये सातारा (शहर), सातारा तांडा व देवळाई (ग्रामीण यांचा समावेश आहे.) सातारा हा भाग शहर म्हणून गणना होत असलेने सातारा या क्षेत्राची अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रगणक गट निहाय लोकसंख्या उपलब्ध झाली आहे. तथापि, सातारा तांडा व देवळाई हे ग्रामीण क्षेत्र असल्याने या क्षेत्राकरीता प्रगणक गट निहाय लोकसंख्या उपलब्ध झालेली नाही. तथापि, दि.१८-१-२०१५ ते २१-१-२०१५ या कालावधीत सातारा तांडा व देवळाई परिसरातील जनगणनेच्या प्रगणक गटामध्ये सन २०११ च्या जनगणनेच्या वेळेस त्याठिकाणी राहत असलेल्या नागरीकांची माहिती घेण्यात आली त्याआधारे प्रगणक गट निहाय लोकसंख्येपैकी अनुसूचित जातीची लोकसंख्या-१२७२ व अनुसूचित जमाती लोकसंख्या-१०९ आढळुन आलेली आहे. औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये नव्याने समावेश झालेल्या भागामध्ये सातारा (शहर), सातारा तांडा व देवळाई (ग्रामीण यांचा समावेश आहे.) सातारा हा भाग शहर म्हणून गणना होत असलेने सातारा या क्षेत्राची अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रगणक गट निहाय लोकसंख्या उपलब्ध झाली आहे. तथापि, सातारा तांडा व देवळाई हे ग्रामीण क्षेत्र असल्याने या क्षेत्राकरीता प्रगणक गट निहाय लोकसंख्या उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे दि.१८-१-२०१५ ते २१-१-२०१५ या कालावधीत सातारा तांडा व देवळाई परिसरातील जनगणनेच्या प्रगणक गटामध्ये सन २०११ च्या जनगणनेच्या वेळेस त्याठिकाणी राहत असलेल्या नागरीकांची माहिती घेण्यात आली त्याआधारे प्रगणक गट निहाय लोकसंख्येपैकी अनुसूचित जातीची लोकसंख्या-१२७२ व अनुसूचित जमाती लोकसंख्या-१०९ आढळुन आलेली आहे. त्यानुसार या भागातील अनुसूचित जमातीची लोकसंख्या १०८० एवढी आहे व त्याचा विचार करून नैसर्गिक हद्दी विचारात घेवुन लोकसंख्या निकषा आधारे वॉर्ड रचना केली आहे. यामधील दोन्ही वॉर्ड आरक्षित करण्यात आले नसून यापैकी एक वॉर्ड अनुसूचित जमाती (महिला) करीता आरक्षित आहे. तर दुसरा वॉर्ड सर्वसाधारण / खुला आहे. ही सर्व कार्यवाही नियमानुसार झाली आहे. करिता, हरकत फेटाळणे योग्य. | |

| अ. क्र. | हरकत क्रमांक | दिनांक | हरकतदाराचे नाव व पत्ता (सर्वश्री व श्रीमती) | संबंधीत प्रभाग क्रमांक | हरकतीचे स्वरुप व कथन | महानगरपालिकेचे अभिप्राय | सुनावणीनंतर प्राधिकृत अधिकाऱ्यांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ५ | ७/७/२०१५ | दादासाहेब सुरेंद्र भंडे (भ्र.क्र.७५८८१८५४९९) | ११४, ११५ | वॉर्ड क्र.११४ व ११५ च्या हद्दी संबंधी हरीरामनगर ही वसाहतीचा नविन वॉर्ड रचनेमध्ये उल्लेख केलेला नाही. | आक्षेपाचा विचार करता आक्षेपात नमूद हरीरामनगर वसाहत मौ.सातारा गट क्र.१२६/२ वर आहे व तीचा समावेष वॉर्ड क्र.११५ मध्ये होतो. सबब वॉर्ड क्र.११४ च्या व्याप्तीमध्ये सदर वसाहतीचा उल्लेख करणे योग्य. त्याप्रमाणे अंतिम प्रभाग रचनेच्या व्याप्तीमध्ये ह्या वसाहतीचा उल्लेख करण्यात येईल. करीता सदर सूचना मंजुर करण्यास हरकत नाही. | |

आयुक्त
महानगरपालिका, औरंगाबाद